दै. सकाळ

14 JUL 2017

# आता एका क्लिकवर पीएमपीचे अपडेट !

## बसच्या वेळापत्रकाची काटेकोर अंमलबजावणी

**पुणे, ता. १३ :** बस कोणत्या ठिकाणी आहे, ती किती वाजता निघाली आणि किती वाजता पोचली. थांब्यावर किती वेळ थांबली. त्यात किती प्रवासी होते. किती उत्पन्न मिळाले आदी माहिती पुणे महानगर परिवहन महामंडळातर्फे (पीएमपी) विकसित करण्यात आलेल्या अत्याधुनिक नियंत्रण कक्षात मिळत आहे. त्यामुळे बसचालक आणि वाहकांना आता थांब्यावर वेळेत बस पोचविणे भाग पडणार आहे. त्यामुळे वेळापत्रकाची काटेकोर अंमलबजावणी आता शक्य होणार आहे.

पीएमपीच्या वेळापत्रकानुसार बससेवा सुरू राहावी, यासाठी इंटेलिजंट ट्रान्झिट मॅनेजमेंट सिस्टिम (आयटीएमएस) कार्यक्षमपणे सुरू केली आहे. तिकिटांच्या सुसूत्रीकरणासाठी ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन सिस्टिम (आयएफसीएस) देखील सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे तिकिटांची रक्कम, दर दिवशीचे प्रत्येक बसचे उत्पन्न आणि निर्धारित उत्पन्नाच्या तुलनेत येणारी तूट आदी गोष्टींवर नजर ठेवणे शक्य झाले आहे.

> **या नियंत्रण कक्षामुळे आता काही कर्मचाऱ्यांकडून होणारे गैरप्रकार बंद होतील. प्रवाशांमध्ये पीएमपीबद्दल विश्वासार्हता निर्माण व्हावी, त्यांना वेळेत आणि पारदर्शक सेवा मिळावी, या दृष्टिकोनातून हा कक्ष सुरू केला आहे. महिलांसाठीच्या 'तेजस्विनी बस'ची निविदा प्रक्रिया सुरू आहे. देशात काही ठिकाणी 'इलेक्ट्रिक बस'ची चाचणी घेण्यात येत आहे. सार्वजनिक वाहतुकीचा लाइव्ह डाटा असलेली यंत्रणा केवळ पीएमपीतच आहे.**
> – **तुकाराम मुंढे,** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपी

पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे म्हणाले, ''नियंत्रण कक्षाद्वारे बससेवेतील कमतरता शोधून, त्यात सुधारणा करणे शक्य होणार आहे. प्रत्येक बसमधील इत्थंभूत माहिती कक्षातून पीएमपी प्रशासनाला एका क्लीकवर मिळत आहे. त्या आधारे संबंधित चालक, वाहक आणि अधिकाऱ्यांविरुद्ध पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. ब्रेक डाउन झाल्याची माहिती मिळाल्यावर दुरुस्तीसाठी संबंधित व्हॅन काही वेळातच त्या ठिकाणी पोचणार आहे.''

**कर्मचाऱ्यांसाठी प्रात्याक्षिक**

वाहक- चालकांचे गट करून त्यांना कक्षातील यंत्रणेची माहिती देण्यात येत आहे. पीएमपी तोट्यात का आहे. प्रत्येक बसवर दररोज होणारा खर्च आणि बसचे रोजचे उत्पन्न, त्यांच्याकडून बसच्या वेळापत्रकात होणाऱ्या चुका, भविष्यातील आवश्यक सुधारणा आदी विषयीची माहिती त्यांना या वेळी देण्यात येत आहे. या कक्षातील माहिती तीन ते ३० सेकंदांत अपडेट होते. आतापर्यंत सुमारे ७ हजार कर्मचाऱ्यांना प्रात्यक्षिकांसह येथील यंत्रणेचे काम समजावून सांगण्यात आले आहे.

### स्मार्ट फोनवर काढता येणार पीएमपीचा पास

पुणे महानगर परिवहन महामंडळातर्फे (पीएमपी) नव्याने अपग्रेड करण्यात आलेले पीएमपीचे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे बस बुक करण्यासाठी आणि पास काढण्यासाठी प्रवाशांनी डेपोत जाण्याची गरज नाही. ही कामे आता आपल्या स्मार्ट फोनवर करता येणार असून, त्यामुळे पीएमपी अधिक प्रवासी केंद्रित झाली आहे. संकेतस्थळावर जर्नी प्लॅनर, रेग्युलर सर्व्हिस, रात्रसेवा, पुणे दर्शन, विमानतळ सेवा, डॅशबोर्ट आणि सिटीझन कॉर्नर अशी महत्त्वाची फीचर देण्यात आली आहेत.

पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे म्हणाले, ''इच्छितस्थळी जाण्यासाठी हवी असलेली बस शोधण्याबरोबरच 'पुणे दर्शन' बसचे सीट आरक्षित करणे, विमानतळाकडे जाणाऱ्या बसची माहिती घेणे, घरगुती कार्यक्रमासाठी बस बुक करणे, आदी कामे या संकेतस्थळाद्वारे करता येतील. बसच्या रोजच्या फेऱ्यांचे नियोजन, प्रत्यक्षातील फेऱ्या, किती तक्रारी दाखल झाल्या व किती सोडविण्यात आल्या, आदींची माहिती त्यातून दररोज अपडेट केली जाणार आहे. संकेतस्थळाप्रमाणे पीएमपीचे 'पीएमपी ई-कनेक्ट' हे ॲप्लिकेशनदेखील अपडेट करण्यात आले आहे.''